ORDER

Home Department, Mantralaya,
Mumbai-400 032
Dated the 31st July. 2003

Motor Vehicles Act.1988

No. MCT 0802/1353/CR 193/TRA-5 - Whereas. by Government Notification, Home Department No. MVA.5957/59100-XII, dated the 28th October 1959 the Motor Accident Claims Tribunal consisting of a single member (hereinafter called the ' Claims Tribunal ' for the area comprised within the limits of the Municipal Corporation of Greater Bombay (hereinafter referred to as "the said area") has been constituted f the purpose of adjudicating upon claims for compensation in respect of accidents involving the death of or bodily injury to. persons arising out of use of motor vehicles, or damages to any property of a third party so arising, or both (hereinafter refered to as 'the said purpose")

And Whereas, the first additional Claims Tribunal has been constituted vide Government Notification, Home Department No.1270/28813/XII/B(I), dated the 1st November 1972, 2nd additional Claims Tribunal has been constituted vide Government Notification, Home Department No. MCT.0279/6/TRA-6. dated the 2nd June 1981. the third additional Claims Tribunal has been constituted vide Government Notification. Home Department, No.MCT.0283/2/TRA-6. dated the 18th May 1984 for the said area and for the said purpose ;

And whereas, the 4th additional Claims Tribunal has been constituted vide Government Notification, Home Department, No. MCT-0901/1165/CR-117(A)/TRA-5, Dated the 28th May 2002 for the said area and for the said purpose ;

And whereas it is necessary to regulate the distribution of business among them :

Now, therefore in exercise of the powers confered by sub section 4 of section 165 of the Motor Vehicles Act. 1988 (59 of 1988), the Government of Maharashtra hereby orders that :-

(1) The Chairman. Motor Accident Claims Tribunal shall take into consideration the total number of pending cases in all the existing Claims Tribunals and transfer the pending cases to the Claims Tribunal including newly created Claims Tribunal so as to ensure equal distribution of cases in each Claims Tribunal.

(2) The newly filed cases shall be allotted to each Claims Tribunal serially.

By order and in the name of the
Governor of Maharashtra.

P.K. Sagdeo
Deputy Secretary to Government.

आदेश

गृह विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : [illegible] जुलै,२००३

मोटार वाहन अधिनियम, १९८८

क्रमांक : एमसीटी-०८०२/१३५३/सीआर-११३/परि-५ - ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, गृह विभाग क्र.एमव्हीए-५९५७/५११००-बारा, दि.२८ ऑक्टोबर १९५९ याद्वारे, मोटार वाहनाच्या वापरामुळे व्यक्तीचा झालेला मृत्यू किंवा तिला झालेली शारिरिक इजा यांचा समावेश असलेल्या अपघाताच्या बाबतीतील नुकसान भरपाई किंवा त्यामुळे त्रयस्थ व्यक्तीच्या कोणत्याही मालमत्तेचे झालेले नुकसान किंवा दोन्ही यांसाठीच्या दाव्यांवर अभिनिर्णय देण्या प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा "उक्त प्रयोजनार्थ" असा निर्देश करण्यात आला आहे) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत येणा-या क्षेत्रासाठी (यात यापुढे ज्याचा "उक्त क्षेत्र" असा निर्देश करण्यात आला आहे) एक सदस्य असलेले मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, (यात यापुढे ज्याला "दावा न्यायाधिकरण" असे संबोधण्यात आले आहे) घटीत करण्यात आले आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रासाठी व उक्त प्रयोजनासाठी पहिले अतिरिक्त दावा न्यायाधिकरण घटित करण्यात आले आहे. पहा. शासकीय अधिसूचना, गृह विभाग क्र.१२७०/२८८१३/बारा/बी (एक), दि.१ नोव्हेंबर, १९७२, दुसरे अतिरिक्त दावा न्यायाधिकरण घटीत करण्यात आले आहे. पहा शासकीय अधिसूचना, गृह विभाग क्र.एमसीटी ०२७९/६/ टीआरए-६, दि.२ जून, १९८१, तिसरे अतिरिक्त दावा न्यायाधिकरण घटीत करण्यात आले आहे. पहा शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्र.एमसीटी ०२८३/२/टीआरए-६, दि.१८ मे, १९८४.

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रासाठी आणि उक्त प्रयोजनासाठी चौथे अतिरिक्त दावा न्यायाधिकरण घटित करण्यात आले आहे. पहा शासकीय अधिसूचना, गृह विभाग, क्र.एमसीटी ०९०१/११६५/सीआर-११७ (ए)/टीआरए-५, दि.२८ मे २००२.

आणि ज्याअर्थी, त्यांच्यामध्ये कामाच्या विभागणीचे विनियमन करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम १६५ चे पोटकलम ४ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, असे आदेश देत आहे की :-

१) अध्यक्ष,मोटार वाहन दावा न्यायाधिकरण हे सर्व विद्यमान दावा न्यायाधिकरणांकडील एकूण प्रलंबित प्रकरणे विचारात घेतील आणि प्रत्येक दावा न्यायाधिकरणाकडील प्रकरणांची समान विभागणी व्हावी यासाठी नव्याने निर्माण करण्यात आलेल्या दावा न्यायाधिकरणाचा समावेश असलेल्या दावा न्यायाधिकरणाकडे प्रलंबित प्रकरणे वर्ग करण्यात येतील.

२) नव्याने दाखल करण्यात आलेली प्रकरणे प्रत्येक दावा न्यायाधिकरणाकडे अनुक्रमाने नेमून देण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. कृ. सगदेव
शासनाचे उपसचिव